The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे आधुनिक विचार

**प्रा.डॉ.मोरे अर्जुन मोहनराव**
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख), वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदुर ता.अंबाजोगाई, जि.बीड.

**प्रस्तावना :**

महानुभव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांचा जन्म इ. स. ११९४ साली झाला. ते बाराव्या शतकातील महान संत असून ते पुरोगामी, क्रांतिकारक विचाराचे होते. त्यांनी मराठी भाषेतील 'लीळाचरित्र' हा पहिला ग्रंथ लिहिला. चक्रधर स्वामी यांच्या काळात समाजात स्त्री-पुरुष विषमता, जातीभेद, वर्णभेद, अस्पृश्यता, अनिष्ट प्रथा, परंपरा मोठ्या प्रमाणात प्रचलित होत्या. त्यांना समाजातील विषमता आणि अनिष्ट प्रथा पाहून अतिशय चिड येत असे. ते समाजातील विषमता आणि अनिष्ट प्रथांना प्रखर विरोध करून सामाजिक समता, एकात्मता, सर्वधर्म समभाव, समाजात समान समता, स्वातंत्र्य, बंधुता, मानवता इत्यादी मूल्य समाजात रुजवण्याचे सातत्याने कार्य करीत असत. त्यांनी स्त्री शिक्षण, स्त्रियांना स्वातंत्र्य, स्त्री पुरुष समानता, अंधश्रद्धा, धार्मिक कर्मकांड इत्यादी संबंधी विचार मांडले. त्यांनी समाजात पुरोगामी विचारांचे प्रबोधन करण्याकरिता सातत्याने भ्रमण केले. त्यांच्या पुरोगामी व क्रांतिकारी विचारामुळे त्यांचा मोठ्या प्रमाणात शिष्यगण निर्माण झाला.

चक्रधर स्वामी यांनी बाराव्या शतकात मानलेल्या पुरोगामी क्रांतिकारक विचारांचे अनुकरण महात्मा गांधी, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाज सुधारकांनी करून ते विचार अस्तित्वात आणलेले दिसून येतात. चक्रधर स्वामी यांच्या आधुनिक विचारांचे अध्ययन करण्याकरिता "सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे आधुनिक विचार" या विषयाची संशोधनाकरिता निवड करण्यात आली. सदरील संशोधन विषयाला अनुसरून पुढील प्रमाणे अध्ययनाच्या उद्दिष्टांची मांडणी करण्यात आली.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) चक्रधर स्वामी यांच्या विचारांचे स्वरूप अभ्यासणे.
2) चक्रधर स्वामी यांच्या आधुनिक विचारांचा आढावा घेणे.
3) चक्रधर स्वामी यांच्या पुरोगामी क्रांतिकारक विचारांच्या अनुकरणाचा आढावा घेणे.

सदरील संशोधन विषयाच्या अध्ययनाकरिता मांडण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या पडताळणी करिता पुढील प्रमाणे गृहीतकांची मांडणी करण्यात आली.

**गृहीतके :**

1) चक्रधर स्वामी यांचे पुरोगामी विचार आधुनिक समाजात दिसून येतात.

2) चक्रधर स्वामी यांचे विचार वैचारिक तारखीक मानवतावादी आहेत.

3) चक्रधर स्वामी यांचे पुरोगामी क्रांतिकारक विचार सामाजिक व राष्ट्रीय विकासाला सहाय्यभूत ठरले.

उपरोक्त गृहीतकांच्या अध्ययनाकरिता खालील प्रमाणे संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या मांडणी करिता वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला. तर अध्ययन विषयाच्या तथ्य संकलनाकरिता द्वितीय स्रोतातील प्रकाशित व अप्रकाशित स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला. प्रकाशित स्रोतांमध्ये संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, वार्षिक अंक, शासकीय अहवाल इत्यादीचा वापर करण्यात आला. तर अप्रकाशित स्त्रोतांमध्ये एम.फिल., पीएच. डी., यांचे प्रबंध, खाजगी संस्थाचे अहवाल, इंटरनेट इत्यादीचा अवलंब करण्यात आला.

**विषय प्रतिपादन :**

चक्रधर स्वामी पुरोगामी विचाराचे होते त्यांना लिंगभेद, जातीभेद, वर्णभेद, स्पर्श-अस्पर्श, उच्च-नीचता मान्य नव्हती. त्यांना समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता, मानवता अपेक्षित होती. तसेच अहिंसा, खरे बोलणे, प्राणीमात्रावर दया, निराधार दुबळ्या व्यक्तींना मदत करणे या मूल्यांचा लोकांनी स्वीकार करावा असे अपेक्षित होते. त्यांच्या पुरोगामी विचारांचे स्वरूप पुढील प्रमाणे दिसून येते.

**1) चक्रधर स्वामी यांच्या आधुनिक (पुरोगामी) विचारांचे स्वरूप :**

चक्रधर स्वामी यांनी मानवावरील बंधने मान्य नव्हते. त्यामुळे त्यांनी स्त्री-पुरुष यांच्यातील श्रेष्ठ कनिष्ठत्वाला विरोध करून स्त्रियांना पुरुषा समान स्वातंत्र्य व अधिकार असले पाहिजेत असे स्पष्ट केले. तसेच त्यांनी मानवनिर्माता एक आहे असे नमूद करून समाजातील वर्णवेद, जातीभेद, अस्पृश्यता यांना विरोध केला. या सामाजिक भेदभावामुळे सामाजिक एकात्मता लोप पाहून समाजात ताण-तणाव व दंगली, हिंसाचार घडून येतो असे स्पष्ट केले. त्यांनी समाजात शांतता प्रस्थापित व्हावी याकरिता अहिंसा, सत्यवर्तन, सहकार्य या मूल्यांना महत्त्व दिले. सामाजिक व राष्ट्रीय विकासामध्ये अंधश्रद्धा, धार्मिक कर्मकांड, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा अडथळा ठरतात हे स्पष्ट करून या अनिष्ट प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा बंद करण्याकरिता वैचारिक, तार्किक, वैज्ञानिक विचारांचा प्रसार करून ते

समाजात रुजवण्याचे कार्य केले. त्यांचे पुरोगामी विचार 21व्या शतकात सर्वच क्षेत्रांमध्ये प्रचलित असलेले दिसून येत आहेत.

**2) व्यक्ती स्वातंत्र्य व मूलभूत अधिकारांचा पुरस्कार :**

चक्रधर स्वामींनी व्यक्ती स्वातंत्र्य व मूलभूत अधिकारांचा पुरस्कार केला. त्यांच्या मते ईश्वराने मानवाच्या निर्मितीमध्ये कोणताही भेदभाव केला नाही. त्यामुळे सर्व मानव प्राणी समान आहेत. या सर्व मानवांना समान व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्वइच्छाप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार आहे. कोणीही कोणाच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर, अधिकारावर बंधने घालू शकत नाही. त्यांच्या या विचाराचे आधुनिक काळात अनुकरण केले जात आहे. आज सर्वच स्त्री-पुरुषांना समान व्यक्तिस्वातंत्र्य व मूलभूत अधिकार देण्यात आले आहेत.

**3) अनिष्ट प्रथा, परंपरा आणि अंधश्रद्धांचे निर्मूलन :**

चक्रधर स्वामी यांनी स्त्रिया वरील बंधने वर्णभेद, जातीभेद, अस्पृश्यता, धार्मिक कर्मकांड, भोंदूगिरी इत्यादी अनिष्ट प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यांना प्रखर विरोध केला. या अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा मानव, सामाजिक व राष्ट्रीय विकासाला अडथळा ठरतात हे समाजाला पटवून दिले. मानव, समाज, राष्ट्र यांच्या विकासाकरिता वैचारिक, तार्किक, वैज्ञानिक विचारांची आवश्यकता नमूद केली. तसेच मानवाला शिक्षणाची आवश्यकता कृषी विकास, औद्योगिक प्रगती यांचे महत्त्व पटवून दिले.

**4) सामाजिक एकात्मतेचा पुरस्कार :**

चक्रधर स्वामी यांनी धार्मिक सनातनी व्यक्तींना विरोध केला. त्यांनी नमूद केले की, सनातनी व्यक्ती सामाजिक, राष्ट्रीय आणि मानवी विकासामध्ये कोणतेही कार्य करीत नाहीत. ते स्वतःचे वर्चस्व निर्माण करून दीनदुबळ्या लोकांचे शोषण करतात. अशा धार्मिक, जातीय, पाखंडी व्यक्तींना थारा देऊ नये. त्यांनी नमूद केले की, महिला, शेतकरी, कष्टकरी, दलित यांनी धार्मिक कर्मकांड, धार्मिक अंधश्रद्धा यामध्ये गुंतू नये. त्यांनी वर्णभेद, जातीभेद बाळू नये, सर्वांनी एकात्मतेने जीवन जगावे, सर्व जाती धर्माच्या स्त्री-पुरुषांनी एकमेकांना बंधू-भगिनी मानावे. समाजात एकात्मता निर्माण करावी. तेव्हाच समाजात शांतता प्रस्थापित होऊन सामाजिक विकास घडून येईल.

**5) अहिंसा व सत्य वर्तनाचा पुरस्कार :**

चक्रधर स्वामींनी अहिंसा व सत्य वर्तनाचा पुरस्कार केला. त्यांच्या मते, मानवाने नेहमी अहिंसा अंगी बाळगली पाहिजे. प्राणीमात्रावर दया करावी, दिन दुबळ्यांना त्रास व इजा करू नये, कोणाच्या भाव-भावना दुखवू नये, आपल्या वर्तनाद्वारे इतरांना त्रास होऊ नये, अहिंसा ही मानवी एकात्मता, सामाजिक विकास, दया, प्रेम आणि आनंद यांचा मूलभूत आधार आहेत. तसेच मानवाने सदैव सत्यवर्तन ठेवावे. सत्यवर्तनामुळे आत्मिक विकास घडून येतो. खोटे बोलू नये, खोटे बोलल्यामुळे

मानसिक समाधान मिळत नाही, इतरांची फसवणूक होते. म्हणून हिंसा, असत्यवर्तन, खोटे बोलणे पाप आहे. जे मानवाला दु:ख निर्माण करते, मानवाने केलेले इतरांची फसवणूक ही त्याला कधीच समाधान देत नाही. चक्रधर स्वामींना युद्ध मान्य नव्हते. त्यांनी सदैव अन्याय, अत्याचाराला कडाडून विरोध केला. ते आयुष्यासंबंधी नमूद करतात की, मानवाने मुंगीला देखील मारू नये. प्राणीमात्रांना त्रास देऊ नये. त्यांनाही जीवन जगण्याचा अधिकार आहे. प्राणीमात्रावर प्रेम करावे. त्यांना सहारा द्यावा. त्यांच्यावर दया करावी.

**6) सर्व धर्म समभाव :**

चक्रधर स्वामींनी सर्व धर्म समभाव हे तत्व अंगी बाळगले होते. त्यांनी कोणत्याही धर्माला श्रेष्ठ, कनिष्ठ मानले नाही. सर्व धर्माला समान न्याय व महत्त्व दिले. त्यांच्या मते, कोणताही धर्म श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. सर्वच धर्माचे तत्त्वज्ञान मानवाने सामुदायिक जीवन कसे जगावे यासंबंधीचे आहे. सर्व धर्माने मानवाला मानवी जीवनाची शिकवण दिली आहे. त्यामुळे सर्व धर्म समान आहेत. धार्मिक संघर्ष निर्माण करणारे धर्मातील पाखंडी लोक स्वतःचा स्वार्थ साधण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहेत. अशा धर्म पाखंडी व्यक्तीमुळे धर्माचे मूल्य, पवित्रे संपुष्टात येत आहे. या धर्म पाखंडी लोकांना थारा देऊ नये, धार्मिक संघर्ष करू नये. सर्वच धर्माचे आचार विचार अनुकरणात आणावेत. धार्मिक एकात्मता प्रस्थापित करावी. सर्व धर्मांचा सन्मान करावा. तेव्हाच सामाजिक राष्ट्रीय एकात्मता घडून येईल.

**7) चक्रधर स्वामी यांच्या विचारांचे अनुकरण :**

चक्रधर स्वामी यांनी बाराव्या शतकात मांडलेल्या पुरोगामी विचारांचे अनुकरण महात्मा गांधी यांनी अहिंसा, सत्य आचरण या स्वरूपात केले. तर महात्मा फुले यांनी स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांना व्यक्तिस्वातंत्र्य, समान अधिकार या स्वरूपात आचरणात आणले. राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रिया, दलित, दुर्बल घटकांना समान अधिकार, सर्वांगीण स्वातंत्र्य, सामाजिक समानता, आरक्षण, शैक्षणिक स्वातंत्र्य, कृषी विकास या स्वरूपातून आचरणात आणले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समानता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांना संविधानाच्या माध्यमातून आचरणात आणले. आज सर्वत्र चक्रधर स्वामी यांच्या पुरोगामी विचाराचे अनुकरण होत आहे.

**मूल्यमापन :**

चक्रधर स्वामी यांचे पुरोगामी विचार क्रांतिकारक असून ते मानव, समाज, समुदाय, राष्ट्र आणि भौतिक घटक यांच्या विकासाला प्रेरणादायी ठरणारे आहेत. त्यांच्या विचारांचे अनुकरण करून भारतीय समाज सुधारक, राजकीय नेते, विचारवंत यांनी सामाजिक राष्ट्रीय विकास घडवून आणला आहे.

**सारांश :**

चक्रधर स्वामी पुरोगामी विचारांचे होते. त्यांनी स्त्री-पुरुष, स्पर्श-अस्पृश्य, वर्णभेद, शुभ-अशुभ, अनिष्ट प्रथा इत्यादींना प्रखड विरोध करून मानव, समाज, समुदाय, राष्ट्र यांच्या एकात्मिक विकासासंबंधी विचार मांडले. त्यांच्या विचारातून व्यक्ती स्वातंत्र्य, मानवी अधिकार, सामाजिक समानता इत्यादीचा विकास झाला.

**संदर्भसूची**

1) प्रा. रा.णा. घोटाळे, "सामाजिक शास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर. 2003
2) सोहनी भालचंद्र (संपा), "लीळा चरित्र", श्रीपाद प्रकाशन, पुणे. 2004
3) डॉ. कोलते वि.भि., "महानुभव तत्त्वज्ञान".
4) संकपाळ बापूजी, "चक्रधर", नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, मुंबई. 2009
5) महंत डोळसकर बी., "चक्रधर प्रभू की चिन्नस्थाली".
6) https//www.lokmat.com cdn-ampproject.org